संतान फर्नांडीस
वि.
दिगंबर चोपडेकर वगैरे
सीएनआय क्र.एमएचएसआय–०५–०००१२८२०२४

## निशाणी ५१ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियत व विनाम्हणणे हा आदेश रद्द करणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे कथन संक्षिप्त रुपात असे आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना दि.१८/०४/२०२४ पुर्वी काही दिवस दाव्याचे समन्स प्राप्त झालेले असून प्रतिवादी क्र. २ व ४ हे दि.१८/०४/२०२४ रोजी तर प्रतिवादी क्र. ३ हे दि.२५/०४/२०२४ रोजी प्रस्तुत दावेकामी हजर झालेले आहेत. प्रस्तुत प्रतिवादी यांना दि. १६/०७/२०२४ पुर्वी कैफियत व म्हणणे देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी कैफियत व म्हणणे न दिल्याने दि.०४/१२/२०२४ रोजी प्रतिवादीविरुध्द 'कैफियत नाही' असा आदेश पारीत झालेला आहे. परंतु प्रतिवादी यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्र वेळीच उपलब्ध न झाल्याने कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ हे वयोवृध्द असून ते मदनीसशिवाय एकट्याने प्रवास करु शकत नाहीत. प्रतिवादी क्र. ३ व ४ हे नोकरीनिमित्त ठाणे/मुंबई येथे राहत असल्याने व्यक्तीगत व नोकरीविषयक अडचणींमुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आलेली नाही. सदर विलंबामागे त्यांचा कोणताही निष्काळजीपणा नव्हता व न्यायालयाचा अवमान करण्याचा देखील उद्देश नव्हता. प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी न दिल्यास त्यांचे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. सबब, न्यायाच्या पुर्ततेकरीता प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्याविरुध्द झालेला कैफियत नाही व म्हणणे नाही हा आदेश रद्दबातल करुन त्यांची कैफियत व म्हणणे सादर करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती त्यांनी प्रस्तुत अर्जान्वये केलेली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून वादी यांना तो मान्य व कबूल नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना कैफियत व म्हणणे देण्यास २४४ दिवस म्हणजेच सुमारे आठ महिने एवढा प्रदिर्घ विलंब झालेला आहे, सदरचा विलंबाकरीता दिलेली कारणे समाधानकारक व संयुक्तीक नाहीत. नाम.सर्वोच्च

न्यायालय यांच्या सीसीसी वि.व्हेईकल फॅक्टरी २०१२(३) महा.लॉ.रिपोर्टर पृष्ठ क्र. ५७४ या न्यायनिर्णयामधील विलंबाबाबत नोंदविलेल्या निष्कर्षानुसार, असाधारण विलंब माफ करण्यात येवू नये असे निर्देश दिलेले आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

०४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कारण व अभिलेखाचे परिक्षण केले असता प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस विलंब झालेला आहे. नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार कोणत्याही दाव्याचा निकाल गुणवत्तेवर अंतिमरित्या लावण्याकरीता व भविष्यातील दाव्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता दोन्ही पक्षांना समान संधी देणे अपेक्षीत आहे. प्रस्तुत कामातील तथ्यांचा विचार करता प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबामुळे वादी यांना झालेला त्रासाची प्रतिवादी यांच्यावर खर्च बसूवन भरपाई होऊ शकते. प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबामुळे प्रस्तुत दावे कामी झालेला विलंब देखील विचारात घेवून त्याअनुषंगाने प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्यावर खर्च बसविणे न्यायोचित होणार आहे व सदर अटीवर प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन संधी देणे अपेक्षित आहे. या करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. निशाणी ५१ येथील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्याविरुध्द झालेला दावा विना कैफियत व विना म्हणणे चालविण्याचा आदेश त्यांनी वादी यांना रक्कम रुपये १२००/– इतका खर्च देण्याच्या अटीवर रदद्बातल करण्यात येतो.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2025.11.25 14:45:17 +0530

स्थळ – वेंगुर्ला
दिनांक – २१/११/२०२५

**(एस.जे. चिवटे)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
वेंगुर्ला.